**आरोग्य सेवा संचालनालय**
**(महाराष्ट्र राज्य)**
आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,
पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१.

| | | |
|---|---|---|
| कार्यालय<br>मंचालक (वैयक्तिक)<br>सहसंचालक (अर्थ व आस्थापना)<br>मुख्य प्रशासकीय अधिकारी | दूरध्वनी<br>22621006<br>22621186<br><br>22621973 | Website : http://arogya.maharashtra.gov.in<br>Email : dhsdesk5@yahoo.com<br>Email : caodhs.mumbai@gmail.com<br>Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS) |
| | | क्र.संआसे/शुश्रुषा/कक्ष ९/शिकाना/बंधपत्रित सेवा नियमन/३२८८-८६/१७<br>दिनांक - १५/१२/२०१७ |


प्रति,
उपसंचालक, आरोग्य सेवा,
मंडळ कार्यालये (सर्व)

विषय : बंधपत्रित अधिपरिचारीकांच्या सेवा नियमित करणेबाबत.

संदर्भ : १. सा.आ.वि., सेवा-५, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक याचिका-२०१७/श्रीम खानंदे/प्र.क्र.३०२/सेवा-५, दिनांक १४.१२.२०१७

२. सा.आ.वि. अधिसुचना दिनांक १५.०४.२०१५

३. संचालनालयाचे पत्र दिनांक २५.०१.२०१७

उपरोक्त विषयी संदर्भात नमूद शासन पत्राचे अनुषंगाने सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा, मंडळ कार्यालये यांना बंधपत्रित अधिपरिचारीकांच्या सेवा नियमित करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. ज्या बंधपत्रित अधिपरिचारीका दि. २५.०८.२००५ रोजी कार्यरत होत्या व आजही कार्यरत आहेत व महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे दि. १०.०९.२००३ च्या पत्रामध्ये दिलेल्या अटी व शर्ती पुर्ण करतात अशा अधिपरिचारीकांच्या सेवा सदर पत्रात दिलेल्या सुचनांनुसार नियुक्तीच्या प्रथम दिनांकापासून नियमित करण्यात याव्यात.

२. दि. २५.०८.२००५ च्या नंतर बंधपत्रित अधिपरिचारीका म्हणून सेवेत आलेल्या आणि दि. ३१.१२.२०११ रोजी पर्यंत कार्यरत असलेल्या बंधपत्रित अधिपरिचारीकांच्या सेवा सा.आ.वि. अधिसुचना, दिनांक १५.०४.२०१५ मधील परिच्छेद क्रमांक १३ नुसार नियमित कराव्यात.

३. सदर अधिसुचनेनुसार ज्या बंधपत्रित अधिपरिचारीकांनी विशेष लेखी परीक्षा दिली आहे व या परीक्षेत ज्या उत्तीर्ण झाल्या आहेत अशा सर्व बंधपत्रित अधिपरिचारीकांच्या सेवा नियमित करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले नसतील तर ते तात्काळ पुढील सात दिवसाच्या आत निर्गमित करावेत.

४. सदर अधिसुचनेनुसार ज्या पात्र बंधपत्रित अधिपरिचारीकांनी अद्याप विशेष लेखी परीक्षा दिली नाही अशा सर्व बंधपत्रित अधिपरिचारीकांकरीता अधिसुचनेतील तरतूदीनुसार दुसरी संधी देण्याकरीता विशेष लेखी परीक्षेचे आयोजन करण्याच्या दृष्टीने अशा लेखी परीक्षा अद्याप न दिलेल्या बंधपत्रित अधिपरिचारीकांची संख्या दि.२२.१२.२०१७ पर्यंत संचालनालयास कळवावी.

५. दि. ०१.०१.२०१२ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या बंधपत्रित अधिपरिचारीकांनी नियमित होण्यासाठी संचालनालयामार्फत आयोजित भरती प्रक्रियेत त्यांची निवड होणे आवश्यक आहे. त्यांच्या सेवा अशी निवड झाल्यानंतर देण्यात येणाऱ्या नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून नियमित करण्यात येतील.

उपरोक्त सुचनांनुसार तात्काळ कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करावा.

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

( डॉ. सतीश पवार )
संचालक आरोग्य सेवा, मुंबई
(शिबिर कार्यालय, नागपूर)

प्रत : मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, सेवा-५, मुंबई यांना माहितीस्तव सादर.